12:47:20 PM

नि. दि. दावा क्र. ९४/२०२३

राधाबाई वि. शिवनाथ

निशाणी क्र. २४ लगत

**आदेश**

निशाण ४ च्या यादी सोबत अनु.क्र.३ ते ११ येथील दस्त सार्वजनिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याला **निशाण क्र.३७ ते ४५** देण्यात येते. निशाण ३६ च्या यादीसोबत अनु.क्र.१ येथील दस्त सार्वजनिक स्वरुपाचा असल्यामुळे त्याला **निशाण क्र.४६** देण्यात येते.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. निकम**

१२. माझ वय ५० वर्ष आहे. माझी जन्मतारीख दि.१७.१२.१९७३ आहे. मी सातवी नापास आहे. माझे लग्न दि.०६.०५.१९९० रोजी झाले. दि.०६.०५.१९९० पासून माझे सासर लाखणी (मांडकी) ता.वैजापूर येथे राहते. माझे पती शेती करतात. लाखणीला माझ्या पतीची साधारण साडेतीन एकर जमीन आहे. हे खरे आहे की, लाखणी येथील शेती मी व माझे पती करतात. माझ्या नावावर शेती आहे. त्याचा गट क्रमांक आठवत नाही. त्याचे क्षेत्र २५ गुंठे आहे.

१३. मांडकी येथील शेतील १९९५–९६ सालात घेतली. मी त्या खरेदी पत्राची नक्कल दाखल करु शकते. माझ्या वडीलांचे नाव हरिनारायण भिंगारे आहे. ते १९९७–९८ साली वारले. माझ्या वडीलांची एकूण शेती किती आहे हे मला आठवत नाही. मला याची माहिती नाही की, माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीमध्ये जमीन विक्री केली होती किंवा कसे. मला लिहता वाचता येत नाही.

प्रश्न– तुमच्या सरतपासात तुम्ही असे नमूद केले की, वडीलांनी जमीन विक्री केली होती हे तुम्ही कशाच्या आधारे लिहले

उत्तर– बहिणीला जमीन विकली होती.

दावा लिहित असताना वकिल साहेबांना सर्व कागदपत्र दिले होते.

मी जमिनीचे सातबारे व फेरफार पाहिले होते. हे खरे आहे की, १९९० ते १९९८ पर्यंत आम्ही मांडकी येथे राहत होतो. हे खरे आहे की, माझे वडील वारले त्यावेळेस त्यांच्या अंत्यविधीला मी आले होते. हे खरे आहे की, मी माझ्या सासरी आजही सुखात राहते व तेव्हाही सुखात राहत होते. ३० जून १९९८ ला मी मांडकी येथे होते.

१४. हे खरे आहे की, माझे लग्न झाल्यापासून वडील वारे पर्यंत, वडील, भाऊ, बहिण, भाऊजाय असे शेती करुन पोट भरत होते. हे खरे आहे की, ज्यावेळेस दावा केला तोपर्यंत माझे माझ्या वडीलांशी, भावाशी, भाउजाईशी संबंध चांगले होते. हे खरे नाही की, माझा त्यांच्याविरुध्द कोणताही राग नाही.

१५. मला जमिनीचे गट क्रमांक सांगता येणार नाही. मला दावा मिळकतीचे गट क्रमांक आता आठवत नाही.

प्रश्न– रमाबाईला वडीलांनी जमिन विकली तेव्हा तुम्ही आक्षेप घेतला का

उत्तर– त्यावेळेस माझे लग्न झालेले नव्हते व मी संज्ञान नव्हते.

वडीलांनी रमाबाईला विकलेल्या खरेदी पत्राची नक्कल मी पाहिलेली आहे. ते खरेदी पत्र मी समजून घेतलेले आहे. ते खरेदी पत्र ३ एकरचे आहे. हे खरे आहे की, बहिणीच्या नावाने झालेल्या खरेदी पत्राच्या फेरबाबत मी हरकत घेतली नाही. साक्षीदार सांगते की, ती बहिण होती. हे खरे आहे की, बहिणीसोबत झालेल्या व्यवहाराच्या वेळेस मी हजर नव्हते. हे खरे आहे की, माझ्या बहिणीला १९९८ साली जमीन विक्री केली याची माहिती मला तेव्हापासून होती.

१६. हे खरे आहे की, माझ्या वडीलांनी बहिणीला जमिन विकली व सख्खी बहिण असल्यामुळे मी त्याबाबत आक्षेप घेतला नाही. हे खरे आहे की, १९९० पासून ते वडील हयात असे पर्यंत वडीलांनी शेतीमधून उत्पन्न घेतले व त्याबाबत मला काही आक्षेप नव्हता.

प्रश्न– भाऊ व भाउजाय यांनी जमिन वाटून घेतली त्याआधारे फेर झालेला आहे

उत्तर– त्यांनी मला सांगितलेले नाही.
मला हे आठवत नाही की, वाटणीबाबतचा फेर कोणत्या वर्षी झाला. मी त्या फेरबाबत आक्षेप घेतलेला आहे. मी त्या फेरबाबत न्यायालय दाद मागितलेली आहे. या दाव्याव्यतिरिक्त मी फेरबाबत अन्य कोणताही दावा दाखल केलेला नाही.

१७. एकनाथ दगडू गायकवाड यांना मी ओळखते. हे खरे आहे की, माझ्या वडीलांनी एकनाथ दगडू गायकवाड यांना १९८८ साली जमिन विकली होती. मला हे आठवत नाही की, कैलास बाबुराव भिंगारे यांना १९९२ ला जमीन विक्री केली होती. हे खरे नाही की, माझे लग्न झाल्यापासून वडीलांनी मला लागेल तसे पैसे दिलेले आहे. हे खरे नाही की, मांडकी येथील जमिन विकत घेताना पैसे कमी पडले म्हणून वडीलांनी दिलेले पैसे त्या मिळकतीच्या वेळेस वापरण्यात आले. हे खरे नाही की, त्यावेळेस पैशाच्या स्वरुपामध्ये मी माझा जमिनीतील हिस्सा स्विकारला होता.

१८. मांडकी येथील शेती मी ४० हजारात घेतली. ते ४० हजार माझ्या पतीने दिल्याबाबत पुरावा मी सादर करु शकते. हे खरे नाही की, माझ्या पतीने ते पैसे दिल्याबाबत खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, ते पैसे माझ्या भावाने दिले होते. हे खरे नाही की, त्यामुळे मी त्या खरेदीला व त्याच्या फेरला आक्षेप घेतला नाही. हे खरे आहे की, वडील हयात असेपर्यंत मी त्यांच्याकडे हिस्सा मागितलेला नाही. हे खरे नाही की, मांडकीच्या जमिनीबाबत मला पैसे मिळाले होते म्हणून मी त्या कारणावरुन आक्षेप घेतला नव्हता.

१९. हे खरे आहे की, वडील वारल्यानंतर माझे भाऊ, भाउजाई शेती करतात व जमिनीतून चांगले उत्पन्न घेतात. हे खरे आहे की, लग्न झाल्यापासून आजपर्यंत मी दावा मिळकतीत जावून शेती केलेली नाही. हे खरे नाही की, माझ्या पतीची व माझ्या मांडकी येथील जमिनीतून जास्त उत्पन्न येत नाही. माझ्या स्वतःच्या जमिनीतून २० ते २५ हजाराचे उत्पन्न मिळते. माझ्या पतीच्या मिळकतीतून दोन ते अडीच लाखाचे उत्पन्न होते. हे खरे आहे की, मी व माझे पती स्वतः शेती करतो

त्यामुळे आम्हाला इतके उत्पन्न मिळते व त्यामुळे आम्ही बाहेर जात नाही. हे खरे आहे की, माझे वडील वारल्यापासून मी भावाकडे कधीही शेती करायला गेले नाही. हे खरे नाही की, माझा भाऊ व भाउजाई हे शेतीमध्ये चांगले उत्पन्न घेतात ही गोष्ट मला पटली नाही म्हणून दावा दाखल केला. हे खरे नाही की, मी माझ्या पती आणि इतर सर्व नातेवाईकांशी सल्लामसलत करुन दावा दाखल केला. हे खरे नाही की, दावा दाखल करायला माझ्या पतीने मला प्रोत्सहान दिले. हे खरे नाही की, मला जमिनीमध्ये हक्क मागण्याचा अधिकार नाही.

२०. माझ्या बहिणीच्या सास–याला जमिन विक्री केल्याबाबतचा व्यवहार मला मान्य आहे. माझ्या बहिणीला जमिन विक्री केल्याबाबतचा व्यवहार मला मान्य आहे. हे खरे नाही की, मला माझा भाऊ, भाउजाई व भाचा यांचा सुख पहावत नाही त्यामुळे मी दावा दाखल केला. २६ जानेवारी २०२३ रोजी मी मांडकीला होते. हे खरे नाही की, माझ्या पतीने सर्व कागदपत्र पाहून वकिलांशी सल्लामसलत करुन त्यांच्या सल्ल्यांने दावा दाखल केला. तहसिलमधून मी स्वतः कागदपत्र काढले. मी तहसिलमध्ये वाटणीपत्र पाहिले होते. त्या वाटणीपत्राबाबत मी तहसिलदार यांच्याकडे तक्रार केलेली नाही. हे खरे आहे की, तहसिलमधील वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे मी तक्रार दाखल केलेली नाही. हे खरे आहे की, जो फेर झाला त्याप्रमाणे भाऊ, भाउजाई व भाचा यांच्या ताब्यामध्ये क्षेत्र स्वतंत्ररित्या आहे. मला हे सांगता येणार नाही की, कैलास भिंगारे व प्रतिवादी क्र.३ यांच्या ताब्यामध्ये क्षेत्र आहे किंवा कसे. साक्षीदार सांगते की, मी ५ ते ६ वर्षापासून जमिनीत गेलेली नाही. हे खरे नाही की, मला माझा हिस्सा फार पूर्वी मिळालेला असल्यामुळे हिस्सा मागण्याचा अधिकार मला नाही.

२१. हे खरे नाही की, माझा भाऊ, भाउजाई आणि भाचा यांना त्रास देण्यासाठी खोटी कहाणी करुन खोटी केस दाखल केली. हे खरे नाही की, खोट्या आशयाचे शपथपत्र दाखल केले.

**उलटतपास पूर्ण.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.03.13 13:41:41 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १३/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

01:35:12 PM कन्नड.

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 13/03/2025 |
| Order signed by the Presiding Officer | 13/03/2025 |
| Order uploaded on | 13/03/2025 |